# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
संकेतस्थळ/Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. ३१९ / २०२४

**विषय : पीएच्.डी प्रबंध मूल्यमापनासाठी बहि:स्थ परीक्षक नामिका (External Referee Panel) ऑनलाईन पध्दतीने जमा करणेबाबत...**

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित संशोधन केंद्रे यांना कळविण्यात येते की, संशोधक विद्यार्थ्यांच्या पीएच्.डी. पदवी प्रदान करण्याच्या प्रक्रियेतील प्रबंध मूल्यमापन हा एक महत्वाचा भाग आहे. सदर मूल्यमापनाची प्रक्रिया विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशाप्रमाणे विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात येते.

सद्यस्थितीत पीएच्.डी. प्रबंध मूल्यमापनाची प्रक्रिया पार पाडण्याकरिता संशोधन मार्गदर्शक बहि:स्थ परीक्षकांची नावे व त्यांचे Bio-Data असलेली विहीत प्रपत्रात छापील प्रतीमध्ये स्वाक्षरीसह नामिका या कार्यालयात सादर करतात व त्यावर या कार्यालयामार्फत प्रचलित पध्दतीने कार्यालयीन कार्यवाही केली जाते. परंतु या प्रचलित पध्दतीने कार्यवाही करताना संशोधन मार्गदर्शक यांच्याकडून नामिका जमा करण्यापासून कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण करण्यास कालापव्यय होत असल्याचे दिसून येते. तसेच या प्रक्रियेत संशोधन मार्गदर्शकांना प्रत्यक्षरित्या विद्यापीठात यावे लागत असल्याने त्यांच्या वेळचा अपव्यय होतो.

त्याअनुषंगाने पीएच्.डी. प्रबंध मूल्यमापनासाठी असलेल्या वरील प्रक्रियेतील कालव्यपय कमी करून ही प्रक्रिया जलद गतीने होण्यासाठी ऑनलाईन प्रक्रिया विहीत करण्यात आली आहे. यापुढे संशोधन मार्गदर्शकांनी सदर नामिकेची छापील प्रत कार्यालयात जमा न करता बहि:स्थ परीक्षकांची नावे (External Referee Panel) ऑनलाइन पध्दतीने त्यांच्या BoD लॉगीनमधून भरावीत व त्यासोबत परीक्षकांचा Bio-Data अपलोड करावा.

संशोधन मार्गदर्शकांनी ऑनलाईन पध्दतीने नामिका सादर केल्यानंतर संबंधित अभ्यास मंडळाचे मा. अध्यक्ष यांच्या BoD लॉगीनमध्ये सदर नामिका संगणक प्रणालीच्या माध्यमातून पाठविली जाईल. अशी नामिका प्राप्त झाल्यापासून सात दिवसात संबंधित अभ्यासमंडळाचे मा. अध्यक्ष यांना ती पुढे संबंधित विद्याशाखेचे मा. अधिष्ठाता यांना संगणक प्रणालीमार्फत सादर करावयाची आहे. संबंधित विद्याशाखेच्या मा. अधिष्ठाता यांनाही पुढील सात दिवसात ही नामिका संगणक प्रणालीमार्फत मा. प्र-कुलगुरू यांना सादर करावयाची आहे. मा. प्र-कुलगुरू यांचेमार्फत सदर नामिका मा. कुलगुरू यांना सादर केली जाईल.

सदर प्रणाली दि. ०१ जानेवारी, २०२५ पासून सुरू करण्यात येत आहे. दि. ०१ जानेवारी, २०२५ नंतर बहि:स्थ परीक्षक नामिका (External Referee Panel) छापील प्रत कार्यालयात जमा करू नये.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ: शै.प्रवेश/४१६५ )
दिनांक: ३१.१२.२०२४ )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

D:\General Circulars\Referee Panel Online.docx

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

1. मा. कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ.
2. मा. प्र-कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ.
3. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
4. मा. अध्यक्ष, सर्व नियमित व तदर्थ अभ्यास मंडळे, प्रस्तुत विद्यापीठ.
5. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
6. मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी संलग्नित सर्व संशोधन केंद्रे/संस्था.
7. सर्व मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शक, प्रस्तुत विद्यापीठ.